**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

**मासं/रवका/न.क्र.०९/ ०१७३९**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmhrmsedcl@gmail.com
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. ०२२ - ६९४२५१४१
**दिनांक: १४.०१.२०२६**

# परिपत्रक

**विषय:** राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय महत्वाच्या दिनानिमित्त कार्यालयामार्फत केल्या जाणाऱ्या खर्चाच्या रक्कमेमध्ये वाढ करणेबाबत.

**संदर्भ:** सामान्य स्थायी आदेश क्र.४५४ दि.१३.०४.१९५९ चे सुधारपत्र क्र.१ दि.०१.१२.१९८०.

.......

म.रा.वि.वि.मंडळ, सामान्य स्थायी आदेश क्र.४५४ दि.१३.०४.१९५९ अन्वये प्रजासत्ताक दिन व त्यासारखे इतर महत्वाचे राष्ट्रीय दिन साजरे करण्याकरीता होणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सुधारपत्र क्र.१ दि.०१.१२.१९८० अन्वये खर्चाच्या रक्कमेमध्ये वाढ करण्यात आलेली होती.

२. राष्ट्रीय दिवस साजरे करण्याकरीता कंपनीच्या सर्व स्तरावरील कार्यालयांकरीता दिल्या जाणाऱ्या खर्चाच्या रक्कमेमध्ये वाढ करणे ही बाब कंपनी प्रशासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने, सक्षम अधिकारी यांनी प्रदान केलेल्या मंजुरीनुसार, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन यासारखे राष्ट्रीय तसेच महाराष्ट्र दिन असे राज्यस्तरीय महत्वाचे दिन साजरे करण्याच्या अनुषंगाने कंपनीच्या विविध स्तरावरील कार्यालयामार्फत केल्या जाणाऱ्या खर्चाच्या रक्कमेच्या मर्यादेत खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कार्यालय | खर्चाची रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | सांघिक कार्यालय | २५,०००/- |
| २ | प्रादेशिक कार्यालय | १०,०००/- |
| ३ | परिमंडळ कार्यालय | १०,०००/- |
| ४ | मंडळ कार्यालय | ७५००/- |
| ५ | विभागीय कार्यालय | ५०००/- |
| ६ | उप विभागीय कार्यालय | २५००/- |
| ७ | शाखा कार्यालय | २५००/- |

३. तसेच, एकाच आवारात कंपनीची एकापेक्षा जास्त कार्यालये असल्यास तेथे स्थित वेगवेगळया कार्यालयांसाठी स्वतंत्रपणे खर्च करण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकरणी संबंधित आवारातील वरीष्ठ कार्यालयाकडून राष्ट्रीय व राज्यस्तरीय दिवस/सण साजरा करण्यात यावा. सदर कार्यक्रमाचा एकूण खर्च संबंधित वरीष्ठ कार्यालयाच्या सुधारीत खर्चाच्या मर्यादेत करण्यात यावा.

४. उपरोक्त सुधारणा परिपत्रक निर्गमित केलेच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**(भूषण कुलकर्णी)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ वित्त व लेखा)/(पायाभूत आराखडा)/(विशेष प्रकल्प)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/ क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)/(नियोजन)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.